दै. प्रजावाणी दि. 03.01.2020

दै. प्रजावाणी दि. 03/01/2020

# चोरट्यांची टोळी गजाआड

## 'एलसीबी'ने चौघांच्या आवळल्या मुसक्या

## पाच दुचाकींसह १५ लाखाचा ऐवज जप्त

नांदेड,दि.२: शहर व जिल्ह्यात घरफोडी व लुटमार करणाऱ्या अट्टल चोरट्यांच्या टोळीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. अटक केलेल्या चोरट्यांकडून पाच दुचाकीसह १५ लाखांचा ऐवज जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केल्याची माहिती पोलिस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी गुरूवारी (दि.२) दुपारी पत्रकार परिषदेत दिली. अटक केलेल्यामध्ये चार चोरट्यांचा समावेश आहे.

शहर व जिल्ह्यात लुटमार करणाऱ्या टोळीचा शोध घेण्याचे आदेश पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर, अतिरिक्त पोलिस अधिक्षक दत्ताराम राठोड यांनी दिले होते. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी पथकाची स्थापना करुन शहरात गस्त घालत घरफोडी व लुटमार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला.

पथकाला बुधवारी (दि.१) मिळालेल्या गुप्त माहितीवरुन आकाश बंडू गुंजावळे (वय २१, रा. गोपाळनगर, बायपास रोड, नांदेड) व उत्सव महादू बलाड (वय १९, रा. मालटेकडी, नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी मागील सहा महिण्यात नांदेड शहर, परिसरात आसना पुल बायपास मार्ग, मालटेकडी पुलाखाली, डिमार्ट मार्ग, सोनखेड मार्ग, सिडको आदी मार्गावर आठ जणांना अडवून रॉडने मारहाण करत खंजरचा धाक दाखवून लुटल्याची कबूली दिली.

घरफोडीसाठी स्थापन केलेल्या पथकाने संजय उर्फ समिर पंडित नामनूर (वय २८, रा. महेबुबनगर, नांदेड) व सय्यद हनिफ उर्फ हनी सय्यद जाफर (वय २०) या दोघांना अटक केली. या चोरट्यांनी शहरातील विविध नगरातील गेल्या दोन वर्षापासून शिवविजय कॉलनी, चैतन्यनगर,

पान २ वर